जिल्हा व सत्र न्यायालय, भंडारा

निविदा सूचना

क्रमांक/संगणक/ १९२ /२०२५. दिनांक: ३० /०७/२०२५

मानननीय प्रमूख जिल्हा व सत्र न्यायाधीश, भंडारा यांचे दिनांक २९/०७/२०२५ चे आदेशान्वये जिल्हा न्यायालय, भंडारा व अधिनस्थ/तालूका न्यायालय (तुमसर/मोहाडी/साकोली/पवनी/लाखणी/लाखांदूर) येथे नवीन लॅन कनेक्शन लावणे व जुने लॅन कनेक्शन दुरूस्ती करण्याकरिता खालील नमूद प्रपत्र क्रमांक १ मधील वस्तू/सेवांकरिता निविदा मागविण्यात येत आहेत. करिता इच्छूक कंपनी/अभियंता यांनी प्रपत्र क्रमांक १ तसेच नमूद अटी व शर्तीसह सिलबंद निविदा दिनांक ०५/०८/२०२५ ला सायंकाळी ०५:०० वाजेपर्यंत जिल्हा न्यायालय, भंडारा येथे सादर करावे.

त्यानंतर आलेल्या निविदांचा विचार केला जाणार नाही.

प्रपत्र क्रमांक १

Sr. No.	Particulars	Company/ Model	Per Meter/ Per Nos	Rate in Rupees (Including GST)
1	Network Switch (05 Port) 10/100/1000 Giga Hertz/MBPS with Installation	D-Link	Per Nos.	
		Digisol	Per Nos.	
2	Network Switch (08 Port) 10/100/1000 Giga Hertz/MBPS with Installation	D-Link	Per Nos.	
		Digisol	Per Nos.	
3	Network Switch (16 Port) 10/100/1000 Giga Hertz/MBPS with Installation	D-Link	Per Nos.	
		Digisol	Per Nos.	
4	Network Switch (24 Port) 10/100/1000 Giga Hertz/MBPS with Installation	D-Link	Per Nos.	
		Digisol	Per Nos.	
5	Fibre Optical Cable with Installation	---	Per Meter	
6	Digisol Cat 6 Cable with Installation	---	Per Meter	
7	Casing/P.V.C. Pipe with Installation	---	Per Meter	
8	New I. O. Box Installation	---	Per Unit	
9	Old I.O. (LAN) Box Repair Charges	---	Per Unit	
10	I.O. Box to Switch Tagging Fixed Charge	---	Per Connection	
11	Patch Cord Cable (Lan Port to Computer Wire)	---	3 Meter	
12	Patch Cord Cable (Lan Port to Computer Wire)	---	5 Meter	
13	Patch Cord Cable (Lan Port to Computer Wire)	---	10 Meter	
14	Patch Cord Cable (Lan Port to Computer Wire)	---	20 Meter	

अटी व शर्तीः

१.	सदर करार जिल्हा न्यायालय, भंडारा व अधिनस्थ तुमसर, मोहाडी, पवनी, साकोली, लाखणी व लाखांदूर या तालूका न्यायालयाकरिता राहील. लॅन कनेक्शन मध्ये बिघाड आल्यास ते दुरूस्तीकरिता किंवा नवीन लॅन कनेक्शन लावावयाचे असल्यास संबंधित कंपनी/निविदाधारक यांना संबंधित न्यायालयात स्वतः जावून नवीन लॅन कनेक्शन लावणे किंवा जुने लॅन कनेक्शन दुरूस्ती करून देणे बंधनकारक राहील.
२.	निविदेमध्ये नमूद करण्यात आलेले दर सर्व कर आणि इतर शुल्कासहित आहेत असे गृहीत धरण्यात येईल.
३.	निविदा सादर करताना त्यासह कंपनीचा नोंदणी प्रमाणपत्र, पॅन कार्ड, जीएसटी नोंदणी प्रमाणपत्र इ. कागदपत्रांच्या स्वयंःप्रमाणित छायाप्रत सादर करणे बंधनकारक राहील.
४.	करार झाल्यावर कंपनी/निविदाधारकास तक्रार दाखल करण्याकरिता एक ई–मेल आयडी व एक मोबाईल/दूरध्वनी क्रमांक देणे बंधनकारक राहील. ज्यावर जिल्हा न्यायालय, भंडारा व तालूका न्यायालयातील संबंधित कर्मचारी यांचेद्वारे तक्रार नोंदविले जातील.

टिप: १. निविदा सादर करतांना लिफाफ्याच्या पृष्ठभागावर **"नवीन लॅन कनेक्शन लावणे व जुने लॅन कनेक्शन दुरूस्ती बाबतची निविदा"** असा स्पष्ट उल्लेख करावा.

२. निविदा उपरोक्त दिलेल्या प्रपत्रातच सादर करावे. त्यात कोणताही बदल करू नये.

३. निविदा सादर करतांना उपरोक्त नमूद अनु क्रमांक १ ते ४ मधील अटी व शर्ती मान्य असल्याचे स्पष्ट नमूद करावे.

४. निविदा सादर करतांना अटी व शर्तीमधील अनु. क्र. ३ मधील आवश्यक कागदपत्रे निविदेसह न चुकता सादर करावे. अन्यथा निविदांचा विचार केला जाणार नाही व त्या रद्द करण्यात येतील.

आदेशान्वये,

(एस. एम. निमावे)
प्रबंधक,
जिल्हा न्यायालय, भंडारा